# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई

## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन, त्याचे पालन व नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र चौकटीचे कार्यान्वयन) विनियम, २०१६

**अनुक्रमणिका**


| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | संक्षिप्त शीर्षक, व्याप्ती व प्रारंभ | २ |
| २ | व्याख्या | २ |
| | **भाग अ : सर्वसाधारण** | ५ |
| ३ | विनियमांची व्याप्ती आणि लागू करण्याची मर्यादा | ५ |
| ४ | **भाग ब : नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन (आरपीओ)** | ६ |
| | पात्र नूतनशील ऊर्जा स्त्रोत | ६ |
| ५ | बंधन असलेल्या संस्था/व्यक्ती | ७ |
| ६ | कार्य कालावधी | ८ |
| ७ | नूतनशील ऊर्जा खरेदी बंधनाचे (आरपीओ) लक्ष्यांक | ८ |
| ८ | केंद्रीय आयोगाच्या विनियमांतर्गत प्रमाणपत्रे | १० |
| ९ | राज्य अभिकरण | १० |
| १० | वितरण परवानाधारक | ११ |
| ११ | स्व-वापरासाठी वीज निर्मितीचे उपयोगकर्ते व मुक्त प्रवेश ग्राहक | १२ |
| १२ | आरपीओ नियामक आकार | १३ |
| १३ | संनियंत्रणाची व कार्यान्वयनाची चौकट | १३ |
| | **भाग क : नूतनशील ऊर्जेचा दर ठरविणे** | १४ |
| १४ | नवीन कार्य कालावधीमध्ये कार्यान्वित करावयाच्या नवीन नूतनशील ऊर्जा प्रकल्पांकरिता दर ठरविण्याबाबतची तत्त्वे | १४ |
| | **भाग ड : इतर** | १४ |
| १५ | ग्रिडशी जोडणीची चौकट | १४ |
| १६ | शिथील करण्याचे अधिकार | १५ |
| १७ | आदेश आणि कार्यप्रणाली निर्देश | १५ |
| १८ | सुधारणा करण्याचे अधिकार | १५ |
| १९ | अडचणी दूर करण्याचे अधिकार | १५ |

## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई

## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन, त्याचे पालन व नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र चौकटीचे कार्यान्वयन) विनियम, २०१६

**विद्युत अधिनियम, २००३**

**क्रमांक (मविनिआ/--/--)** - महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६१, ६६, ८६(१)(इ) आणि १८१ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या आणि या संदर्भात त्यास समर्थ करणाऱ्या अन्य सर्व अधिकारांचा वापर करुन व पूर्व-प्रसिध्दीनंतर, याद्वारे खालीलप्रमाणे विनियम करीत आहे :-

**१ संक्षिप्त शीर्षक, व्याप्ती व प्रारंभ :-**

१.१ या विनियमांना 'महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन, त्याचे पालन व नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र चौकटीचे कार्यान्वयन) विनियम, २०१६,' असे म्हणावे.

१.२ हे विनियम संपूर्ण महाराष्ट्र राज्यात आणि राज्य आयोगाच्या अखत्यारीत येणाऱ्या सर्व बाबींना लागू राहतील.

१.३ हे विनियम **शासकीय राजपत्रातील** त्यांच्या प्रसिध्दीच्या दिनांकापासून अंमलात येतील.

**२. व्याख्या**

२.१ संदर्भानुसार वेगळा अर्थ अपेक्षित नसेल तर, या विनियमांमध्ये:-

(ए) "**अधिनियम**" म्हणजे विद्युत अधिनियम, २००३,(२००३ चा ३६), त्यात करण्यात आलेल्या सुधारणांसह;

(बी) "**स्व-वापरासाठी निर्माण करण्यात आलेल्या विजेचा उपयोगकर्ता**" म्हणजे अधिनियमाच्या कलम २(८) अंतर्गत व्यक्ती किंवा सदस्य जो स्व-वापरासाठीच्या निर्मिती संयत्रांमध्ये मुख्यत्वे करुन त्याच्या स्वतःसाठी निर्माण केलेल्या विजेचा वापर करतो आणि '**स्वतःसाठी वीज वापर**', या शब्दांचा अर्थ त्यानुसार लावण्यात येईल;

(सी) "**केंद्रीय अभिकरण**" म्हणजे केंद्रीय आयोग वेळोवेळी पद-निर्देशित करील असे अभिकरण**;**

(डी) ‘‘**केंद्रीय आयोग**’’ म्हणजे अधिनियमाच्या कलम ७६ च्या उप-कलम (१) मध्ये उल्लेख केलेला केंद्रीय विद्युत नियामक आयोग;

(इ) ‘‘**प्रमाणपत्र**’’ म्हणजे वेळोवेळी सुधारणा केलेल्या केंद्रीय विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जा निर्मितीसाठी नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र मान्यतेच्या व निर्गमित करण्यासाठीच्या अटी व शर्ती ) विनियम, २०१० (केंद्रीय आयोगाचे आरईसी विनियम) मध्ये करण्यात आलेल्या तरतुदी आणि कार्यपध्दतीनुसार केंद्रीय अभिकरणाने निर्गमित केलेले नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र (किंवा आरईसी);

(एफ) ‘‘**किमान किंमत**’’ म्हणजे केंद्रीय आयोगाच्या आरईसी विनियमांनुसार केंद्रीय आयोगाने निश्‍चित केलेली किमान किंमत - ज्या किंमतीइतक्या आणि अधिक किंमतीस प्रमाणपत्राची खरेदी-विक्री पॉवर एक्सचेंजमध्ये करता येईल;

(जी) ‘‘**कमाल मर्यादा किंमत**’’ म्हणजे केंद्रीय आयोगाच्या आरईसी विनियमांनुसार केंद्रीय आयोगाने निश्‍चित केलेली कमाल मर्यादा किंमत - ज्या किंमतीच्या मर्यादेत पॉवर एक्सचेंजमध्ये प्रमाणपत्राची खरेदी-विक्री करता येईल;

(एच) ‘‘**आंतर-जोडणी ठिकाण**’’ म्हणजे नूतनशील ऊर्जा निर्मिती सुविधा पारेषण यंत्रणा किंवा वितरण यंत्रणेशी, जसे असेल तसे, जोडण्याचे ठिकाणः

एक. पवन ऊर्जा प्रकल्प आणि सौर फोटोव्हॉल्टॅक (पीव्ही) प्रकल्पांच्या संबंधात, संयुक्त उप-केंद्राच्या उच्च दाबाच्या बाजूला असलेल्या बहिर्गामी फीडरवरील लाईन आयसोलेटर हे आंतर-जोडणीचे ठिकाण राहील;

*स्पष्टीकरण* : संयुक्त उप-केंद्र म्हणजे पवनचक्की किंवा सौर विद्युत प्रकल्पाच्या जागेवरील उप-केंद्र, ज्यामध्ये स्टेप-अप ट्रान्सफॉर्मर आणि संलग्न स्विचगिअर असतील आणि त्याच्या कमी दाबाच्या बाजूला बहुविध निर्मिती संच (म्हणजे पवन टर्बाइन जनरेटर्स किंवा सौर पीव्ही मॉडयुल्स/आरेज् (arrays)/इन्व्हर्टर संच) जोडलेले असतील.

दोन. मिनि आणि मायक्रो जल विद्युत, लघु-जल विद्युत, बायोमास विद्युत, अ-खनिज इंधनावर आधारित सह-निर्मिती विद्युत

प्रकल्पांच्या आणि सौर औष्णिक विद्युत प्रकल्पांच्या संबंधात, जनरेटर ट्रान्सफॉर्मरच्या उच्च दाबाच्या बाजूला असलेल्या बहिर्गामी फीडरवरील लाईन आयसोलेटर हे आंतर-जोडणीचे ठिकाण राहील;

(आय) **"एमएनआरई"** म्हणजे भारत सरकारचे नवीन आणि नूतनशील ऊर्जा मंत्रालय;

(जे) **"बंधन असलेल्या संस्था / व्यक्ती"** म्हणजे महाराष्ट्र राज्यातील वितरण परवानाधारक, स्व-वापरासाठीच्या वीज निर्मिती प्रकल्पाची मालकी असणारा उपयोगकर्ता आणि मुक्त प्रवेश ग्राहक यांनी, विनियम ५ मधील अटींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून, या विनियमांतर्गत नूतनशील स्त्रोतांपासूनच्या वीज खरेदीच्या बंधनाचे (आरपीओ) पालन करणे आवश्यक राहील;

(के) **"मुक्त प्रवेश ग्राहक"** म्हणजे पारेषण मुक्त प्रवेश किंवा वितरण मुक्त प्रवेशासाठीच्याा अटी आणि शर्तींचे नियमन करणाऱ्या राज्य आयोगाच्या विनियमांनुसार, मुक्त प्रवेशाचा वापर करुन वीज घेणारी व्यक्ती;

(एल) **"पॉवर एक्सचेंज"** म्हणजे केंद्रीय आयोगाने निर्गमित केलेल्या आदेशांनुसार विजेची खरेदी-विक्री करण्यासाठी चालविण्यात येणारा एक्सचेंज**;**

(एम) **"अधिमान्य वीज दर"** म्हणजे नूतनशील ऊर्जेच्या स्त्रोतांवर आधारित वीज निर्मिती केंद्राकडून वितरण परवानाधारकाला विजेची विक्री करण्यासाठी राज्य आयोगाने, नूतनशील ऊर्जेच्या दराचे निश्चितीकरण करण्यासाठीच्या अटी व शर्तींचे नियमन करणाऱ्या राज्य आयोगाच्या विनियमांना अनुसरुन, निश्चित केलेला वीज दर;

(एन) **"नूतनशील ऊर्जेचे स्त्रोत"** म्हणजे मिनि जल-विद्युत, मायक्रो जल-विद्युत, लघु जल-विद्युत, पवन, सौर, उसाच्या चिपाड्यांसह बायोमास, बायो इंधनावर आधारित सहनिर्मिती, नागरी किंवा नगरपालिका क्षेत्रातील कचरा आणि एमएनआरईने मान्यता किंवा मंजुरी दिलेले अन्य स्त्रोत;

(ओ) **"राज्य अभिकरण" (मेडा)** म्हणजे महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण किंवा राज्य आयोगाकडून वेळोवेळी पद-निर्देशित करण्यात येईल असे अन्य अभिकरण, जे नूतनशील ऊर्जा प्रकल्पांना या विनियमांतर्गत सोपविलेली कार्ये हाती घेण्याकरिता नोंदणीसाठी अधिस्वीकृती देण्याचे व शिफारस करण्याचे काम करील;

(पी) **“राज्य आयोग”** म्हणजे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग;

(क्यु) **“वर्ष”** म्हणजे एक आर्थिक वर्ष.

२.२ (ए) या विनियमांत वापरण्यात आलेले परंतु येथे व्याख्या न करण्यात आलेले शब्द व उक्ती ज्यांची व्याख्या केंद्रीय आयोगाने किंवा राज्य आयोगाने निर्गमित केलेल्या अधिनियमात किंवा विनियमांत करण्यात आलेली असेल तर अशा शब्द व उक्तींचा अर्थ, अधिनियमात किंवा अशा विनियमांत त्यांना देण्यात आलेल्या अर्थानुसार राहील.

(बी) या विनियमांच्या मराठी अनुवादातील व इंग्रजी विनियमांमधील कोणत्याही शब्दांचा/मजकुराचा अर्थ निश्चित करताना कोणताही वाद उद्‌भवल्यास आणि/किंवा कोणतीही विसंगती आढळल्यास मूळ इंग्रजीतील विनियम ग्राह्य धरण्यात येतील.

## भाग अ - सर्वसाधारण

### ३ विनियमांची व्याप्ती आणि लागू करण्याची मर्यादा

३.१ जेथे नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासून सह-निर्मिती करण्यास व नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासून विजेची निर्मिती करण्यास राज्य आयोगाने चालना द्यावयाची आहे आणि अशा स्त्रोतांपासून निर्माण होणारी वीज खरेदी करण्यासाठी वितरण परवानाधारकाच्या क्षेत्रातील एकूण विजेच्या वापराच्या आधारे राज्य आयोगाने टक्केवारी विनिर्दिष्ट करावयाची आहे, अशा सर्व प्रकरणी हे विनियम लागू राहतील.

३.२ हे विनियम खालीलप्रमाणे लागू राहतील :-

(अ) महाराष्ट्र राज्यातील वितरण परवानाधारक

(ब) विनियम ५ मधील अटींच्या अधीन राहून, महाराष्ट्र राज्यातील स्व-वापरासाठीच्या वीज निर्मितीचे उपयोगकर्ते

(क) विनियम ५ मधील अटींच्या अधीन राहून, महाराष्ट्र राज्यातील मुक्त प्रवेश ग्राहक.

## भाग - ब नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन (आरपीओ)

### ४ पात्र नूतनशील उर्जा स्त्रोत

४.१ या विनियमांच्या प्रयोजनासाठी, एमएनआरईने मान्यता किंवा मंजुरी दिलेल्या सर्व प्रकारच्या नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासून निर्माण होणारी वीज विचारात घेण्यात येईल.

परंतु असे की, एमएनआरईने दिलेल्या मान्यतेच्या आधारे राज्य आयोगाने कोणत्याही नवीन तंत्रज्ञानाला मान्यता दिल्यानंतरच, असे नवीन तंत्रज्ञान 'नूतनशील' ठरण्यास पात्र होऊ शकेल.

४.२ पात्र नूतनशील ऊर्जा स्त्रोतांमध्ये खालील बाबींचा मर्यादारहित समावेश राहील :-

(ए) अ-खनिज इंधनावर (उसाच्या चिपाड्यासह) आधारित सह-निर्मिती प्रकल्प (अर्हताकारी असलेले व नसलेले दोन्ही सह-निर्मिती प्रकल्प)

(बी) पवन ऊर्जा

(सी) रॅन्काइन सायकल तंत्रज्ञानावर आधारित बायोमास विद्युत

(डी) लघु जल-विद्युत, मिनी जल-विद्युत, मायक्रो जल-विद्युत

(इ) एमएनआरईने मान्यता दिलेल्या तंत्रज्ञानावर आधारित कचऱ्यापासून वीज निर्मिती

(एफ) सौर विद्युत

(जी) एमएनआरई आणि राज्य आयोगाने मान्यता दिलेल्या नूतनशील ऊर्जा तंत्रज्ञानावर आधारित हायब्रिड नूतनशील ऊर्जा

(एफ) एमएनआरई आणि राज्य आयोगाने मान्यता दिलेला अन्य कोणताही स्त्रोत

परंतु असे की, ग्रिडला जोडलेल्या नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासूनच्या वीज निर्मिती प्रकल्पाची स्थापित क्षमता २५० किलोवॅट आणि अधिक असेल किंवा केंद्रीय आयोगाने वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेल्या अन्य किमान क्षमतेइतकी असेल तर अशी निर्मिती 'पात्र नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासूनची निर्मिती', म्हणून विचारात घेण्यात येईल;

परंतु आणखी असे की, ग्रिडला जोडलेल्या नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासूनच्या वीज निर्मिती प्रकल्पाची स्थापित क्षमता २५० किलोवॅट पेक्षा कमी किंवा राज्य आयोगाने वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेल्या अन्य किमान क्षमते इतकी असेल तर अशी निर्मिती 'पात्र नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासूनची निर्मिती', म्हणून विचारात घेण्यात येईल, परंतु त्यासाठी संबंधित नूतनशील ऊर्जा प्रकल्पाला महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राशी सुयोग्य मिटरींग आणि संपर्क व्यवस्था कराव्या लागतील.

परंतु असेही की, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (छपरावरील सौर फोटो व्होल्टॅक यंत्रणांकरिता नक्त मापन) विनियम, २०१५ च्या कक्षेतील छपरावरील सौर पीव्ही यंत्रणांकडून होणारी पात्र वीज निर्मिती नूतनशील वीज खरेदीच्या बंधनाच्या (आरपीओ) पूर्ततेच्या प्रयोजनासाठी पात्र ठरेल.

४.३ महाराष्ट्र राज्यातील आणि राज्याबाहेरील नूतनशील ऊर्जा निर्मितीसाठी दिलेल्या नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्रांची (आरईसी) खरेदी विनियम ६ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कार्य कालावधीत महाराष्ट्र राज्यातील बंधन असलेल्या संस्था/व्यक्तींनी आरपीओची पूर्तता करण्याच्या प्रयोजनासाठी पात्र दस्तावेज म्हणून विचारात घेण्यात येईल.

## ५ बंधन असलेल्या संस्था/व्यक्ती

५.१ विनियम ७.१ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली टक्केवारी, महाराष्ट्र राज्यातील सर्व वितरण परवानाधारक, मुक्त प्रवेश ग्राहक आणि स्व-वापरासाठी निर्माण केलेल्या विजेचा वापर करणारे उपयोगकर्ते, यांना खाली नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून लागू राहील :-

(ए) ५ मेगावॅट आणि अधिक किंवा राज्य आयोगाकडून वेळोवेळी ठरवून देण्यात येईल अशी अन्य स्थापित क्षमता असलेल्या पारंपरिक खनिज इंधनावर आधारीत ग्रिडशी जोडलेल्या स्व-वापरासाठीच्या निर्मिती संयंत्राची मालकी असणारी कोणतीही व्यक्ती जी अशा संयंत्रापासून निर्माण होणाऱ्या विजेचा उपयोग स्व-वापरासाठी करते, अशा व्यक्तीने अशा खनिज इंधनावर आधारीत स्व-वापरासाठीच्या संयंत्राची वीज ज्या प्रमाणात वापरलेली असेल त्या प्रमाणात अशा व्यक्तीला आरपीओखालील टक्केवारी लागू राहील.

(बी) ज्या व्यक्तीची करारबद्ध मागणी ५ एमव्हीए पेक्षा कमी नसेल आणि जी पारंपारिक खनिज इंधनावर आधारित निर्मितीमधून मुक्त प्रवेशाद्वारे खरेदी केलेल्या विजेचा वापर करते, अशा व्यक्तीने अशा खनिज इंधनावर आधारीत मुक्त प्रवेशाच्या माध्यमातून जितक्या विजेचा वापर केला असेल त्या वापराच्या प्रमाणात अशा व्यक्तीला आरपीओखालील टक्केवारी लागू राहील.

परंतु असे की, वरील उप-खंड (ए) आणि (बी) मध्ये उल्लेख केलेल्या किमान क्षमतेमध्ये राज्य आयोग आदेशाद्वारे वेळोवेळी सुधारणा करु शकेल.

परंतु आणखी असे की, वरील उप-खंड (ए) मधील अट, स्टॅण्डबाय (किंवा आणीबाणीच्या काळात वापरण्यासाठी असलेल्या) स्व-वापरासाठीच्या निर्मिती सुविधेला, लागू राहणार नाही.

## ६. कार्य - कालावधी

या विनियमांतर्गत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या आरपीओ चौकटीच्या कार्य कालावधीस दिनांक १ एप्रिल, २०१६ पासून सुरुवात होईल आणि ती दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत वैध राहील.

## ७. नूतनशील वीज खरेदीच्या बंधनाचे लक्ष्यांक

७.१ प्रत्येक 'बंधन असलेल्या व्यक्ती/संस्थेने', एका वर्षात सर्व स्त्रोतांपासून खरेदी केलेल्या एकूण विजेपैकी पात्र नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासून निर्माण झालेल्या विजेची खरेदी, खालील तक्त्यात नमूद केलेल्या टक्केवारीच्या मर्यादेपर्यंत करील.

| वर्ष | नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासून करावयाच्या वीज खरेदीचे परिमाण (टक्केवारीत व युनिट्समध्ये) | | |
|---|---|---|---|
| | सौर | बिगर-सौर (अन्य नूतनशील ऊर्जा) | एकूण |
| | (ए) | (बी) | (सी) |
| २०१६-१७ | १.०० % | १०.०० % | ११.०० % |
| २०१७-१८ | २.०० % | १०.५० % | १२.५० % |
| २०१८-१९ | २.७५ % | ११.०० % | १३.७५ % |
| २०१९-२० | ३.५० % | ११.५० % | १५.०० % |

परंतु असे की, प्रत्येक वितरण परवानाधारक, आर्थिक वर्ष २०१६-१७ ते आर्थिक वर्ष २०१९-२० पर्यंतच्या कालावधीसाठी प्रति वर्षी ०.२ टक्के बिगर सौर (अन्य नूतनशील ऊर्जा) स्त्रोतांपासून आरपीओ लक्ष्यांकाच्या टक्केवारीची पूर्तता करण्यासाठी मिनी जल-विद्युत किंवा मायक्रो जल-विद्युत प्रकल्पांमधून वीज खरेदी करील.

*स्पष्टीकरण :* बिगर सौर (अन्य नूतनशील ऊर्जा) स्त्रोतांपासून आरपीओ लक्ष्यांकाच्या नमूद केलेल्या टक्केवारीत मिनी, मायक्रो, जल विद्युत प्रकल्पासाठी असलेल्या ०.२ टक्केवारीचा समावेश आहे.

परंतु असे की, जर वितरण परवानाधारकाने मिनी जल किंवा मायक्रो जल विद्युत प्रकल्पांपासून विजेच्या प्राप्तीसाठीचे प्रति वर्षी ०.२ टक्क्यांचे लक्ष्य साध्य करणे, त्याच्या जास्तीत जास्त प्रयत्नांनंतरही, शक्य नसल्याचे कळवीले तर, आयोग,

त्यास बिगर-सौर ऊर्जा आरईसी च्या खरेदीच्या माध्यमातून हे लक्ष्य साध्य करण्याची परवानगी देईल.

परंतु आणखी असे की, बंधन असलेल्या व्यक्ती/संस्थांनी संबंधित वर्षासाठी त्यांना लागू असलेल्या आरपीओ लक्ष्याकांची पूर्तता करण्यामधील **+/-** ५ टक्क्यांच्या मर्यादेतील कोणत्याही तफावतीस, सविस्तर छाननीच्या अधीन राहून, अपवादात्मक परिस्थितीमध्ये परवानगी देण्यात येईल.

परंतु आणखी असे की, ५ मेगावॅट आणि त्यापेक्षा जास्त परंतु १० मेगावॅटपेक्षा कमी सर्वोच्च मागणी असलेले वितरण परवानाधारक, ५ मेगावॅट आणि त्यापेक्षा जास्त परंतु १० मेगावॅटपेक्षा कमी स्थापित क्षमता असलेल्या स्व-वापरासाठीच्या निर्मिती प्रकल्पाचे उपयोगकर्ते आणि ५ एमव्हीए आणि त्यापेक्षा जास्त आणि १० एमव्हीएपेक्षा कमी करारांतर्गत मागणी असलेले मुक्त प्रवेश ग्राहक, यांनी वरील तक्त्यातील रकाना (सी) मध्ये घालून दिलेल्या त्यांच्या फक्त संयुक्त आरपीओ लक्ष्यांकाची वार्षिक पूर्तता करणे आवश्यक राहील.

परंतु असेही की, प्रत्येक वितरण परवानाधारक त्याच्या दीर्घ-कालिन वीज खरेदीच्या योजनेमध्ये, वर विनिर्दिष्ट केलेल्या आरपीओ लक्ष्यांकाची पूर्तता होईल अशा नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासून करावयाच्या वीज खरेदीच्या योजनेचा, समावेश करील.

७.२ प्रत्येक ‘बंधन असलेली व्यक्ती/संस्था’, तिने स्वतः केलेल्या विजेच्या निर्मितीद्वारे किंवा दुसऱ्या नूतनशील ऊर्जा प्रकल्पांमधून विजेची खरेदी करुन किंवा परवानाधारकांकडून खरेदी करुन किंवा नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्रांची खरेदी करुन किंवा या पर्यायांचे एकत्रीकरण (कॉम्बिनेशन) करुन, आरपीओ लक्ष्यांकाची पूर्तता करु शकेल.

परंतु असे की, वितरण परवानाधारकाने थेट वीज निर्मात्याकडून किंवा परवानाधारक वीज व्यापाऱ्याकडून राज्यात निर्माण झालेल्या नूतनशील स्त्रोतांपासूनच्या विजेची, राज्य आयोगाने मान्यता दिलेल्या दरापेक्षा अन्य दराने, केलेली खरेदी अशा वितरण परवानाधारकाने नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनांची पूर्तता करण्यासाठीचे पात्र परिमाण म्हणून विचारात घेतले जाणार नाही.

परंतु आणखी असे की, एमएनआरईच्या किंवा त्यांनी मान्यता दिलेल्या योजने अंतर्गत महाराष्ट्रात निर्माण झालेल्या नूतनशील ऊर्जेची वितरण परवानाधारकाने केलेली खरेदी, अशा योजनेचे स्वरुप विचारात घेऊन अशा वितरण

परवानाधारकाच्या नूतनशील ऊर्जा खरेदी बंधनाच्या पूर्ततेसाठी पात्र परिमाण म्हणून राज्य आयोगाकडून विचारात घेतले जाऊ शकेल.

## ८. केंद्रीय आयोगाच्या विनियमांतर्गत प्रमाणपत्रे

या विनियमांत असलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून, केंद्रीय आयोगाच्या आरईसी विनियमांतर्गत निर्गमित करण्यात आलेली प्रमाणपत्रे ही, बंधन असलेल्या संस्था/व्यक्तींनी या विनियमांतर्गत त्यांच्यासाठी घालून देण्यात आलेल्या नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासून करावयाच्या वीज खरेदीसाठीच्या अनिवार्य बंधनाची पूर्तता करण्यासाठी, वैध दस्तावेज असतील.

परंतु असे की, बंधन असलेल्या संस्था/व्यक्तींनी आरपीओची पूर्तता जर प्रमाणपत्राच्या खरेदीने करण्याचे ठरविले तर, सौर निर्मितीपासून करावयाच्या वीज खरेदीच्या बंधनाची पूर्तता फक्त सौर प्रमाणपत्रांची खरेदी करुनच करण्यात येईल, आणि सौर निर्मिती व्यतिरिक्त अन्य नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासून करावयाच्या वीज खरेदीच्या बंधनाची पूर्तता फक्त बिगर-सौर प्रमाणपत्रे खरेदी करुन करण्यात येईल.

## ९. राज्य अभिकरण

९.१ राज्य अभिकरण, राज्य आयोगाच्या निर्देशांनुसार काम करील आणि केंद्रीय आयोगाच्या आरईसी विनियमांतर्गत त्याची कार्ये पार पाडण्यासाठी केंद्रीय अभिकरणाने तयार केलेल्या कार्यपद्धती आणि नियमानुसार कृती करील.

९.२ राज्य अभिकरण, नूतनशील ऊर्जा निर्मिती कंपन्या, बंधन असलेल्या संस्था/व्यक्ती, महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र, इ. कडून माहिती मागविण्यासाठी उचित कार्यपद्धती तयार करील आणि बंधन असलेल्या संस्था /व्यक्तींनी केलेल्या आरपीओ लक्ष्यांकांच्या पूर्ततेची परिगणना करील.

९.३ बंधन असलेल्या प्रत्येक व्यक्ती/संस्थांनी नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासूनच्या विजेची केलेली खरेदी आणि आरपीओची केलेली पूर्तता याबाबतचा सारांश अंतर्भूत असलेले एक विवरणपत्र राज्य अभिकरणाकडून संचयी तत्त्वावर दर तिमाहीस त्याच्या संकेत-स्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

९.४ या विवरणपत्रात, प्रत्येक बंधन असलेल्या संस्था/व्यक्तीने केलेल्या नूतनशील ऊर्जेच्या खरेदीमध्ये, आरपीओच्या पूर्ततेसाठी तसेच नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्राच्या पध्दतीने केलेल्या नूतनशील ऊर्जा खरेदीच्या संबंधात, अधिमान्य

वीज दराने किंवा राज्य आयोगाने मान्यता दिलेल्या अन्य पध्दतीद्वारे केलेल्या नूतनशील ऊर्जेच्या खरेदीचा, समावेश असेल.

९.५ राज्य अभिकरण, बंधन असलेल्या व्यक्ती/संस्थांनी केलेल्या नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाच्या पूर्ततेसंबंधीची तिमाही स्थिती, ठरवून देण्यात आलेल्या नमुन्यांमध्ये, राज्य आयोगाला सादर करील आणि अशा बंधनाची पूर्तता करण्यासाठी, आवश्यक असल्यानुसार, राज्य आयोगाला उचित उपाययोजना सुचवेल.

९.६ राज्य आयोग, या विनियमांखालील कार्ये पार पाडण्यासाठी राज्य अभिकरणाला देय असलेले शुल्क व आकार, वेळोवेळी ठरवून देईल.

९.७ जर, राज्य अभिकरण त्याची कार्ये समाधानकारकपणे पार पाडू शकत नसल्याची राज्य आयोगाची खात्री झाली तर, राज्य आयोग, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, अन्य कोणत्याही अभिकरणाला राज्य अभिकरण म्हणून काम करण्यासाठी पद-निर्देशित करु शकेल.

## १० वितरण परवानाधारक

१०.१ प्रत्येक वितरण परवानाधारक त्याच्या बहु-वर्षीय वीज दराच्या याचिकेमध्ये कार्य कालावधीतील प्रत्येक वर्षासाठी नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासून करावयाच्या वीज खरेदीच्या परिमाणांचे अंदाज, पुराव्यासह, निर्देशित करील आणि त्यानुसार आरपीओच्या बंधनाची पूर्तता करण्यासाठी व्यवस्था करील.

१०.२ कार्य कालावधीतील प्रत्येक वर्षाकरिता मान्यता दिलेल्या वीज खरेदीच्या परिमाणाच्या संबंधात, नूतनशील वीज खरेदीच्या परिमाणाचे अंदाज या विनियम ७.१ नुसार असतील.

१०.३ प्रत्येक वितरण परवानाधारक वेगवेगळ्या नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासून खरेदी केलेल्या विजेच्या माहितीचे सारांश असलेले विवरणपत्र मासिक तत्त्वावर राज्य अभिकरणाला पाठवील.

१०.४ आर्थिक वर्ष संपल्यानंतर लवकरात लवकर, प्रत्येक वितरण परवानाधारक, विविध नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासून खरेदी केलेल्या विजेचे, वैधानिक लेखापरीक्षकाने यथोचितरित्या प्रमाणित केलेले सविस्तर विवरणपत्र सादर करील.

१०.५ जे वितरण परवानाधारक आरपीओची पूर्तता करु शकणार नाहीत, त्यांना विनियम १२.१ मध्ये विनिर्दिष्ट केलेले आरपीओ नियामक आकार अदा करावे लागतील.

## ११. स्व-वापरासाठीच्या वीज निर्मितीचे उपयोगकर्ते आणि मुक्त प्रवेश ग्राहक

११.१ विनियम ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अटींच्या अधीन राहून, स्व-वापरासाठीच्या वीज निर्मितीचे उपयोगकर्ते आणि मुक्त प्रवेश ग्राहक, त्यांचा वीज वापर आणि त्यांनी संबंधित आरपीओची पूर्तता करण्यासाठी केलेली नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासूनची वीज खरेदी, याबाबतची सविस्तर माहिती राज्य अभिकरणाला मासिक तत्त्वावर सादर करतील.

११.२ स्व-वापरासाठीच्या वीज निर्मितीचे उपयोगकर्ते आणि मुक्त प्रवेश ग्राहक विनियम ७.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे नूतनशील ऊर्जेची खरेदी करतील आणि त्यानुसार त्यांच्या संबंधीत आरपीओची पूर्तता करण्यासाठी व्यवस्था करतील.

११.३ जे स्व-वापरासाठीच्या वीज निर्मितीचे उपयोगकर्ते आणि मुक्त प्रवेश ग्राहक आरपीओची पूर्तता करु शकणार नाहीत त्यांना, विनियम १२ मध्ये विनिर्दिष्ट केलेले आरपीओ नियामक आकार भरावे लागतील.

११.४ स्व-वापरासाठीच्या वीज निर्मितीचे उपयोगकर्ते आणि मुक्त प्रवेश ग्राहक विनियम ८ मधील तरतुदीनुसार नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्रे खरेदी करून त्यांच्या आरपीओची पूर्तता करु शकतील.

११.५ विनियम ५.१ (ए) मधील स्व-वापरासाठीच्या वीज निर्मितीच्या उपयोगाबाबतच्या आणि पात्रता निकषांच्या अटींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून, नूतनशील ऊर्जेवर आधारित स्व-वापरासाठीच्या विद्युत प्रकल्पातील विजेचा स्वतःसाठी वापर केल्यानंतर उरलेल्या शिल्लक विजेची विक्री विनियम ८ मधील तरतुदींनुसार नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्रे मिळण्यास पात्र राहील.

## १२ आरपीओ नियामक आकार

बंधन असलेल्या व्यक्ती/संस्थेने जर या विनियमांत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या आरपीओ लक्ष्यांकाची पूर्तता कोणत्याही वर्षी केली नाही आणि आवश्यक असलेली नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्रे (आरईसी) खरेदी केली नाहीत तर, आरपीओची पूर्तता करण्यासाठी कमी पडत असलेल्या युनिट्सच्या आधारे आरपीओ नियामक आकारांसाठी, आयोगाने सौर आणि बिगर-सौर आरपीओच्या संबंधात निश्चित केलेली वेगवेगळी रक्कम, अशा बंधन असलेल्या व्यक्ती/संस्थेने

निर्माण करावयाच्या व ठेवावयाच्या वेगळ्या निधीमध्ये जमा करण्याचे आयोग निर्देश देईल.

परंतु असे की, वितरण परवानाधारका व्यतिरिक्त बंधन असलेल्या व्यक्ती/संस्थांच्या बाबतीत, अशी बंधन असलेली व्यक्ती/संस्था राज्य अभिकरणाने ठेववावयाच्या आणि प्रशासित करावयाच्या निधीमध्ये आरपीओ नियामक आकार जमा करील.

परंतु आणखी असे की, सौर किंवा बिगर-सौर नूतनशील ऊर्जा निर्मिती स्रोतांकरिता, जसे असेल तसे, त्या वर्षासाठी लागू असलेल्या उच्चतम अधिमान्य वीज दराच्या किंवा केंद्रीय आयोगाने निश्चित केलेल्या कमाल मर्यादा किंमतीने किंवा राज्य आयोगाने ठरवून दिलेल्या अन्य कोणत्याही दराच्या सममूल्य, आरपीओ नियामक आकार असतील;

परंतु आणखी असे की, अशा रितीने निर्माण केलेल्या निधीचा उपयोग राज्य आयोग निर्देश देईल त्यानुसार करण्यात येईल.

परंतु असेही की, आयोग, परिस्थिती विचारात घेऊन संपूर्ण किंवा अंशतः आरपीओ नियामक आकार आणि त्यांच्याशी संलग्न खर्च ग्राहकांकडून वसूल करण्यास परवानगी देणार नाही.

## १३ संनियंत्रण व कार्यान्वयनाची चौकट

१३.१ या विनियमांच्या आधिसूचनेच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत ग्रिड समन्वय समितीच्या (जीसीसी) अधिपत्याखाली एक संनियंत्रण समिती स्थापन करण्यात येईल, ज्यामध्ये जीसीसीच्या प्रत्येक सदस्याला प्रतिनिधीत्व राहील.

१३.२ संनियंत्रण समिती खालील बाबींकरीता जबाबदार राहील :-

(ए) ऊर्जेचे हिशोब ठेवण्यासंबंधीचे आणि नूतनशील ऊर्जा व्यवहारांवरील संनियंत्रणाबाबतचे प्रश्न सोडवणे;

(बी) या विनियमांचे आणि त्या अंतर्गत विकसित करण्यात आलेले नियम व कार्यपद्धती यांचे कार्यान्वयन सुलभ करणे;

(सी) हे विनियम आणि त्या अंतर्गत विकसित करण्यात आलेले नियम आणि कार्यपद्धती कार्यान्वित करीत असताना उद्‌भवू शकणाऱ्या समस्यांचे निर्धारण करणे व सुधारात्मक उपायांची शिफारस करणे;

(डी) या विनियमांच्या कार्यान्वयनासंबंधीच्या बाबींकरिता राज्य अभिकरणाला मार्गदर्शन करणे;

(इ) राज्य आयोगाकडून वेळोवेळी निदेर्शित करण्यात येतील अशा अन्य बाबी;

## भाग सी : नूतनशील ऊर्जेचे दर ठरविणे

### १४ कार्य कालावधीमध्ये कार्यान्वित झालेल्या नूतनशील ऊर्जा प्रकल्पांकरिता दर ठरविण्याबाबतची तत्त्वे

या विनियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कार्य कालावधी दरम्यान कार्यान्वित झालेल्या सर्व नूतनशील ऊर्जा प्रकल्पांना, अशा प्रकल्पातून निर्माण झालेल्या विजेचा दर ठरविण्यासाठी, नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्तींचे नियमन करणाऱ्या राज्य आयोगाच्या विनियमांमध्ये विनिर्दिष्ट केलेली वीज दराची रचना आणि अन्य अटी अनुसरण्याचा किंवा नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्राची (आरइसी) पध्दत स्वीकारण्याचा, पर्याय असेल.

परंतु असे की, जे प्रकल्प पहिला किंवा दुसरा पर्याय स्वीकारतील त्यांना, नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्तींचे नियमन करणाऱ्या राज्य आयोगाच्या विनियमांमध्ये ठरवून दिल्यानुसार, वीज दराच्या संपूर्ण कालावधी किंवा वीज खरेदी कराराच्या वैध कालावधी दरम्यान, जे नंतर होईल त्या कालावधीसाठी, तो पर्याय चालू ठेवावा लागेल;

परंतु असेही की, असे नूतनशील ऊर्जा प्रकल्प, वितरण परवानाधारकांबरोबर किंवा मुक्त प्रवेश ग्राहकाबरोबर, जसे असेल तसे, वीज खरेदी करार करण्यापूर्वी दर ठरविण्याच्या पद्धतीची निवड करतील.

## भाग ड - इतर बाबी

### १५ ग्रीडशी जोडणीची चौकट

संबंधित परवानाधारक, विजेच्या निष्कासनाच्या पायाभूत सोयीसुविधा आंतर-जोडणी ठिकाणाच्या पलिकडे विकसित करण्यासाठी जबाबदार राहील, तर निर्मिती सुविधेपासून आंतर-जोडणीच्या ठिकाणापर्यंत निष्कासनाच्या पायाभूत सोयीसुविधा निर्मिती कंपनीला स्व-खर्चाने विकसित कराव्या लागतील;

परंतु असे की, आंतर-जोडणी ठिकाणाच्या पलिकडील निष्कासनाच्या पायाभूत सोयीसुविधांवरील खर्च परवानाधारकाकडून करण्यात येईल आणि तो राज्य आयोगाने विकसित केलेल्या दर निश्चितीकरणाच्या चौकटीनुसार ग्राहकांकडून वसूल करण्यात येईल.

## १६ शिथील करण्याचे अधिकार

राज्य आयोग, स्वतःहून किंवा हितसंबंधित व्यक्तीने केलेल्या अर्जाच्या संदर्भात, या विनियमांतील कोणतीही तरतूद सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे शिथील करील किंवा लागू करणार नाही. मात्र त्यापूर्वी, यासंबंधीच्या कारणांची लेखी नोंद करण्यात येईल आणि बाधित होऊ शकणाऱ्या व्यक्तींना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात येईल.

## १७ आदेश आणि कार्यप्रणाली निर्देश

अधिनियमातील तरतुदींच्या अधीन राहून, या विनियमांच्या अंमलबजावणी संबंधात आयोग आदेश व कार्यप्रणाली निर्देश देऊ शकेल.

## १८ सुधारणा करण्याचे अधिकार

राज्य आयोग, कोणत्याही वेळी या विनियमांतील कोणत्याही तरतुदीमध्ये बदल, फेरफार, अल्प-बदल किंवा सुधारणा, त्यासंबंधीच्या कारणांची लेखी नोंद करुन, करु शकेल.

## १९ अडचणी दूर करण्याचे अधिकार

या विनियमांतील तरतुदी अंमलात आणताना जर कोणतीही अडचण उद्भवली तर राज्य आयोग, साधारण किंवा विशिष्ट आदेशाद्वारे, अधिनियमातील तरतुदींशी विसंगत नसेल व अडचण दूर करण्यासाठी त्यास आवश्यक वाटेल अशी तरतूद करु शकेल.

अश्वनी कुमार
सचिव,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

मुंबई,
दिनांकः ३० मार्च, २०१६